**महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१.**

**क्रमांक एलपीएल-११७३/२०४३३-(ए)-डी-एक.**—महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ (सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६) याच्या कलम २०, पोट-कलम (१) व पोट-कलम (२) चे खंड (अ) व (ई) याद्वारे प्रदान केलेल्या आणि महाराष्ट्राच्या राज्यपालांना त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे पुढील नियम करीत आहेत :—

**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.**—(१) या नियमांस, महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोक आयुक्त (सक्षम प्राधिकारी) नियम, १९७३ असे म्हणता येईल.

(२) ते तात्काळ अंमलात येतील.

**२. व्याख्या.**—नियमांत, संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर,—

(अ) "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ (सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६) ;

(ब) "कलम" म्हणजे, या अधिनियमाचे कलम ;

(क) अधिनियमात वापरलेले परंतु या नियमांमध्ये व्याख्या न दिलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमामध्ये नेमून दिलेलाच अर्थ असेल.

**३. सक्षम प्राधिकारी.**—खालील तक्त्याच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या (मंत्री किंवा सचिव यांखेरीज इतर) लोकसेवकाच्या संबंधात, त्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये त्यांच्यासमोर विनिर्दिष्ट केलेला प्राधिकारी हा सक्षम प्राधिकारी असेल.

**तक्ता**

| लोकसेवकाचे वर्णन (१) | सक्षम प्राधिकारी (२) |
|---|---|
| १. कलम (२), खंड (के) च्या उप-खंड (दोन) मध्ये असलेल्या वर्णनात बसणारा कोणताही लोकसेवक, | तो लोकसेवक ज्या विभागाचा असेल किंवा तो ज्याला दुय्यम असेल त्या विभागाचा महाराष्ट्र शासनाचा सचिव. |
| २. कलम (२) खंड (के), उप-खंड (तीन) च्या परिच्छेद (अ) मध्ये असलेल्या वर्णनात बसणारा कोणताही लोकसेवक. | ग्रामविकास विभागाचा महाराष्ट्र शासनाचा सचिव. |
| ३. कलम (२), खंड (के), उप-खंड (तीन) च्या परिच्छेद (ब) मध्ये असलेल्या वर्णनात बसणारा कोणताही लोकसेवक. | नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभागाचा महाराष्ट्र शासनाचा सचिव. |
| ४. कलम (२), खंड (के), उप-खंड (चार) यांच्या परिच्छेद (अ) मध्ये असलेल्या वर्णनात बसणारा कोणताही लोकसेवक (समोरच्या स्तंभ २ मध्ये सक्षम प्राधिकारी म्हणून विनिर्दिष्ट केलेल्या लोकसेवकाशिवाय इतर). | तो लोकसेवक त्यावेळी ज्याच्या सेवेत असेल किंवा ज्याच्याकडून त्याला वेतन मिळत असेल अशा व जे महानगरपालिका आहे अशा स्थानिक प्राधिकरणाच्या बाबतीत, महापालिका आयुक्त. |
| ५. कलम (२), खंड (के), उप-खंड (चार) यांच्या परिच्छेद (ब), (क) व (ड) यामध्ये असलेल्या वर्णनात बसणारा कोणताही लोकसेवक. | तो लोकसेवक त्यावेळी ज्याच्या सेवेत असेल किंवा ज्याच्याकडून त्याला वेतन मिळत असेल असे स्थानिक प्राधिकरण, महामंडळ (स्थानिक प्राधिकरणाखेरीज इतर) कंपनी किंवा यथास्थिति संस्था यांच्यावर नियंत्रण असणाऱ्या किंवा त्याच्याशी संबंधित असलेल्या विभागाचा महाराष्ट्र शासनाचा सचिव. |

४. **अन्वेषणाच्या बाबतीत लोकसेवकाला नोटीस देणे.**—(१) लोक आयुक्त किंवा उप लोक आयुक्त (त्याला योग्य वाटेल अशी प्राथमिक चौकशी केल्यानंतर) या अधिनियमाखाली कोणतेही अन्वेषण पार पाडण्याचे योजील त्या बाबतीत, तक्रारीच्या प्रतीसह किंवा त्याने स्वत:च कोणतेही अन्वेषण पार पाडण्याचे योजिले असेल तर त्याची कारणे दर्शवणाऱ्या विवरणपत्रासह यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये दिलेल्या नमुन्यातील नोटीस तो संबंधित लोक सेवकाला पाठवील. त्या नोटीशीमध्ये विनिदिष्ट केलेल्या वेळेत किंवा मंजूर करण्यात येईल अशा पुढील वेळेत (कोणतीही असल्यास) त्याचे उत्तर सादर करण्यास, त्या नोटीशीद्वारे त्या लोकसेवकाला फर्माविण्यात येईल.

(२) अशी नोटीस आणि तिची सहपत्रे यांची एक प्रत संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल.

**अनुसूची**

(नियम ४ पहा)

लोक आयुक्त
—————, मुंबई यांच्या कार्यालयात.
उप लोक आयुक्त

तक्रार क्र. लोक/उप लोक दिनांक २०

तक्रारदार

ज्याच्या विरुद्ध तक्रार आहे तो लोकसेवक

(लोकसेवकाचे नाव व पत्ता द्यावा).

यांस,

लोक आयुक्त
————— यांनी आपल्या पुढील साहित्य विचारात घेऊन, ...........................
उप लोक आयुक्त
.......................... (तक्रारदाराचे नाव व पत्ता) ..........................
यांनी तुमच्या विरुद्ध केलेल्या तक्रारीच्या संदर्भात,

————————— लोक आयुक्त व उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१
स्वतः होऊन पार पाडण्याचा निर्णय घेतला आहे. (सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६) अन्वये अन्वेषण आणि तक्रारीची प्रत सोबत जोडली आहे.

—————————
त्याची कारणे दर्शविणारे विवरणपत्र सोबत जोडले आहे.

उत्तरादाखल जबानी देण्यास आणि शपथपत्राद्वारे तुमचे म्हणणे आणि स्पष्टीकरण देण्यास आणि तुमच्या बचावासाठी तुम्ही ज्यावर भिस्त ठेवू इच्छित असाल अशा, कोणत्याही असल्यास, दस्तऐवजाच्या सत्यप्रती तुमच्या सहीनिशी .......................... (तारीख) रोजी किंवा तत्पूर्वी सादर करण्यास याद्वारे तुम्हाला फर्माविण्यात येत आहे याची नोटीस घ्यावी.

तसेच पूर्वोक्त तारखेस किंवा तत्पूर्वी जबानी देण्यासाठी आणि तुमचे म्हणणे व स्पष्टीकरण मांडण्यासाठी स्वतः हजर राहण्यात तुम्ही कसूर केल्यास किंवा डाकेने किंवा अन्य रीतीने तुमचे उत्तर वगैरे पाठविण्यात कसूर केल्यास, त्या बाबीचा निर्णय तुमच्या गैरहजेरीत घेण्यात येईल याची देखील नोटीस घ्यावी.

माझ्या सहीने आणि कार्यालयाच्या शिक्क्याने दिले.

दिनांक २०

सहाय्यक निबंधक

लोक आयुक्त
—————, मुंबई यांचे कार्यालय.
उप लोक आयुक्त

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**के. जी. परांजपे,**
शासनाचे सचिव.